# व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सन्मती सहकारी बँकेस अभ्यास भेट

व्यंकटेश महाविद्यालयातील बी.कॉम. भाग तीन मधील विद्यार्थ्यांनी सन्मती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेस अभ्यास भेट दिली. श्री व्यंकटेश महाविद्यालय आणि सन्मती बँक यांतील सामंजस्य कराराअंतर्गत सदर भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष बँकिंग प्रणाली कशी चालते, बँकेचे कामकाज, व्यवस्थापन, इत्यादी बद्दल प्रत्यक्ष ज्ञान व्हावे यासाठी महाविद्यालयामार्फत सातत्याने अशा भेटीचे आयोजन केले जाते. या अभ्यास भेटीदरम्यान बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अशोक पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आधुनिक बँकिंग, बँकिंग क्षेत्रातील आव्हाने, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, ई-बँकिंग, बँकेतील कामकाजाचे स्वरूप, नोकरीच्या संधी, इत्यादी बद्दल त्यांनी माहिती दिली. बँकेतील प्रत्यक्षातील चालणारे कामकाज यानिमित्ताने विद्यार्थ्यांना पाहता आले. बँक ग्राहकांची बदलती जीवनशैली, धावपळीच्या आणि धकाधकीच्या आजच्या आधुनिक जीवनशैलीत त्यांच्या गरजा व आवश्यकतांमध्ये होणाऱ्या बदलांप्रमाणे बँकिंग व्यवसायाला देखील नवीन बदल स्वीकारणे अनिवार्य असते तरच बँकिंग क्षेत्र बँक ग्राहकांना समाधानकारक रित्या बँकिंग सेवा पुरवू शकेल. बँकांचा पारंपारिक बँकेंकडून डिजिटल बँकेमध्ये होत असलेला प्रवास त्यामुळे बँकिंग व्यवसायाच्या विस्तारास व वाढीस चालना मिळाली व बँक व्यवसायच्या विकासाची गती वाढली. याचा फायदा बँकेसह बँक ग्राहकांना देखील झाला आहे असे ते म्हणाले. बँकेतील मुख्य व्यवस्थापक, लेखपाल विभाग श्री. अनंत पुजारी यांनी सहकारी बँकेचे व्यवहार, कामकाज पद्धती, आधुनिक बँकिंग प्रणाली, केवायसी पूर्तता, डिजिटल बँकिंग याविषयी प्रत्यक्षात प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. सहकारी बँकेतील कार्यरत विविध विभाग-उपविभाग, अधिकार-जबाबदाऱ्या, व्यवस्थापन रचना, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सदर अभ्यास भेटीचे आयोजन श्री व्यंकटेश महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी. एस. कांबळे यांनी केले. या अभ्यास भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांचे मार्गदर्शन लाभले व सहकार्य लाभले. या अभ्यास भेटीसाठी बी. कॉम. भाग तीन मधील एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.